नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 20/07/2020 (सोमवार)
(सायंकाळ)

---

## कळमेश्वर येथे गोळीबार

पो.स्टे. कळमेश्वर :– पोलिस स्टेशन कळमेश्वर हद्दीतील शिवाजी पार्क, हनुमान नगर, हुडको कॉलनी परिसरात सुधाकर खाडे यांच्या घरी भाड्याने राहत असलेल्या गणेश मेश्राम, वय 32 वर्ष व त्याची पत्नी नामे– सौ. प्रिया गणेश मेश्राम, वय 28 वर्ष रा. हुडको कॉलनी, कळमेश्वर हे आज दिनांक 20/07/2020 रोजी सकाळी 11:00 वा. ते 12:00 वा. दरम्यान घरी हजर असतांना 4 ते 5 अनोळखी इसमांनी घरात येवुन त्यांच्यावर गोळीबार करून ते लगेच घनास्थळावरून पसार झाले.. त्यामध्ये गणेश मेश्राम व त्याची पत्नी प्रिया मेश्राम हे दोघेही गंभीर जखमी झालेले आहेत. जखमींचा उपचार मेयो हॉस्पीटल, नागपूर येथे सुरू असून कळमेश्वर पोलिस तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पथक हे आरोपींचा तसेच सदर घटनेमागील कारणाचा शोध घेत आहे. या घटनेची माहिती मिळताच नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती मोनिका राऊत, उपविभागीय पोलीस अधीकारी सावनेर श्री. अशोक सरंबळकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिटटावार व ठाणेदार पो.स्टे. कळमेश्वर श्री. मारुती मुळूक यांनी तात्काळ घटनास्थळी भेट दिली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर